नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/०७/२०२६ (रविवार)

---

# चोरीचे ०२ गुन्हे उघड, ०१ आरोपी अटक, वाहनासह १८ लाख ३३ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०३/०७/२०२६ रोजी फिर्यादी आनंद प्रकाश कोंडावार, वय ४५ वर्ष, रा. नागपूर यांनी पोलीस स्टेशन उमरेड येथे तक्रार दिली की, फिर्यादीचा ट्रॉपो रेडीएटर कंपनी समोर मोहपा रोडच्या कडेला उभा करून ठेवलेला ट्रक क्र. एम एच—३१/सि क्यु ४१८९ हा यंत्रसामुग्रीसह दिनांक २६/०६/२०२६ ते दिनांक ०२/०७/२०२६ दुपारी ०४.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री. मयंक माधव, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन उमरेड येथील तपास पथकाने सदर गुन्हयात तपासादरम्यान आरोपीचा शोध घेत असता तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे सदर गुन्ह्यातील **आरोपी नामे अनिल श्रीराम चहाकर, वय ३२ वर्ष, रा. गणेशपुर, ता. खामगाव, जि. बुलढाणा, ह. मु. वार्ड क्र. ६, गांगापुर उमरेड हा असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. आरोपीचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले. आरोपी कडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने सखोल विचारपूस केली असता त्याने** पोलीस स्टेशन उमरेड परिसरातून यंत्रसामुग्रीसह ट्रक चोरी केल्याचे तसेच सदर गुन्हयाच्या व्यतिरीक्त पोलीस स्टेशन उमरेड हददीतील कान्हवा गावाच्या शिवारातुन लोखंडी पाईप चोरी केल्याची माहीती

दिली. दोन्ही गुन्हे नमुद आरोपीने त्याच्या साथीदारांसह केल्याची  माहिती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हयातील चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल व गुन्हा करताना वापरलेले वाहन असा एकुण किंमती १८,३३,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **आरोपीस अटक करण्यात आली आहे.**


GOODS
CARRIER
ALL INDIA
PERMIT
MISTI
ARYAN
ASHOK LEYLAND
MH40
AK0130



# मंगळसुत्र जबरीने हिसकावुन नेणाऱ्या महीलांना अटक
# १ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त
# कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— पोलीस स्टेशन कोंढाळी येथे सौ. रेखा श्यामसुंदर गिराळे, वय ४० वर्ष, रा. जुनापाणी टावर, ता. कारंजा घाडगे, जि. वर्धा या दिनांक ०४/०७/२०२६ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी आपले पती सह भाचीचे लग्नाला जाणेकरीता कोंढाळी बसस्टॉप येथे बस मध्ये चढत असता फिर्यादीचे खांद्यावरील बॅग मध्ये ठेवलेले १० ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र किंमती ०१ लाख रुपये चार महिला आरोपीतांनी फिर्यादीचे खांदयावरील बॅग हिसकावुन नागपुर बसमध्ये पळुन गेल्याची घटना घडली.

सदर घटनेची माहिती मिळताच कोंढाळी बस स्टॉप येथे कर्तव्यावर हजर असलेले कोंढाळी पोलीस आणि महीला होमगार्ड यांनी क्षणाचाही विलंब न करता सदर बस थांबवुन वरील चारही महिला आरोपीस शिताफीने ताब्यात घेवुन बॅग मधे असलेले १० ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र किंमती ०१ लाख रुपयाचे फिर्यादीला सुपुर्द करण्यात आले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम ३०४(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला असुन सदर चारही महिला आरोपीतांना कोंढाळी पोलीसांनी दिनांक ०४/०७/२०२६ रोजी अटक केली आहे.

.

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ३० लाख ४० हजार रूपयांचा मुद्‌देमाल जप्त भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०४/०७/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा भिवापूर तहसील टी पॉईंट येथे नाकाबंदी केली असता १४ चाकी वाहन क्रमांक एम एच—१२/एक्स एम—९४२९ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रक चालक नामे १) मोबीन गणी शेख, रा. अड्याळ, ता. पवनी, जिल्हा, भंडारा, क्लीनर नामे २) धम्मदीप अमोल वालदे, वय १९ वर्ष, रा. अड्याळ, ता. पवनी, जिल्हा भंडारा हे मिळुन आले.** पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद १४ चाकी वाहन क्रमांक एम एच—१२/एक्स एम—९४२९ **किंमती ३०,००,०००/— रूपये २) ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण ३०,४०,०००/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी चालक १) मोबीन शेख, रा. अड्याळ, ता. पवनी, जिल्हा, नागपूर २) धम्मदीप अमोल वालदे, वय ३५ वर्ष, रा. अड्याळ, ता. पवनी, जिल्हा नागपूर याच्या विरूध्द पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८), महा. जमीन महसुल अधि. कलम ४, २१ खाण आणि खनिज अधि. कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे**

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# ४ आरोपी अटक
# ३ वाहनातुन ०९ गोवंश जनावरांची सुटका, खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक ०४/०७/२०२६ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी जवाहर टी पॉईंट खापा येथे येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान वाहन क्र. १) एम एच—४०/सी टी—६१०६ २) एम एच—४०/डी सी—२४०६ ३) एम एच—१२/एस एक्स—२९५९ हे तिन वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता चालक नामे **वाहन क्र. १) चा चालक सुमीत मुरलीधर भोयर, वय २७ वर्ष, रा. बडेगाव, ता. सावनेर, जि. नागपुर, वाहन क्र. २) चा चालक लकी भाउराव रूंघे वय २६ वर्ष, रा. ढकारा, जि. नागपूर, वाहन क्र. ३) चा चालक अमोल वसंराव कुडे, वय २७ वर्ष, रा. बडेगाव व त्याचे सोबत असलेला आरोपी क्र ४) जगदीश मनोहर बोरीवार, वय ३८ वर्ष, रा. गोंडीदिग्रस ता. काटोल, जि. नागपूर हे मिळुन** आले. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०९ गोवंशीय जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून तिन्ही वाहन किंमती १२,००,०००/—रूपये आणि ०९ गोवंशीय जनावरे किंमती १,००,०००/—रूपये असा एकुण १३,००,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपी १) सुमीत मुरलीधर भोयर, वय २७ वर्ष, रा. बडेगाव, ता. सावनेर, जि. नागपुर २) लकी भाउराव रूंधे, वय २६ वर्ष, रा. ढकारा ३) अमोल वंसराव कुडे, वय २७ वर्ष, रा. बडेगाव ४) जगदीश मनोहर बोरीवार, वय ३८ वर्ष यांचेविरूद्ध कलम ११(१) (ड) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधि. १९६० सहकलम ५ (अ), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६, सहकलम ६६/१९२ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

# सुरक्षित प्रवासासाठी पोलीस व एसटी महामंडळाची संयुक्त उपाययोजना

एका वृत्तपत्रांमध्ये दिनांक ०१/०७/२०२६ रोजी महामार्ग की मृत्युचा सापळा या शिर्षकाखाली सावनेर—कळमेश्वर मार्गावरील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात वृत्त प्रसिद्ध झाले आहे. सदर वृत्ताची शाहनिशा केली असता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सावनेरकडून कळमेश्वरकडे जाणाऱ्या तसेच कळमेश्वरकडून सावनेरकडे येणाऱ्या बस या महामार्गावरच प्रवाशांची चढ उतार करीत असल्याचे निदर्शनाश आले. सदर प्रकरणाचे गांर्भिय लक्षात घेता श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग आणि पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव, प्रभारी अधिकरी सावनेर पोलीस स्टेशन यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विभागिय वाहतुक अधिकारी श्रीमती रंजु घोडमारे आणि सावनेर डेपो मॅनेजर श्री गुणवंत तायडे यांच्या सोबत सविस्तर चर्चा केली. प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पोलीस प्रशासनाने एसटी महामंडळाच्या अधिकऱ्यांसह बस चालक आणि वाहन यांची बैठक घेऊन प्रवाशी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या . बस निर्धारित सुरक्षित ठिकाणीच थांबविणे, प्रवाशांना सुरक्षितरीत्या चढ—उतार करणे तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, अशा स्पष्ट सूचना सर्व चालकांना आणि वाहकांना देण्यात आल्या .

श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग आणि पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव, प्रभारी अधिकरी सावनेर यांनी सावनेर बसस्थानकाचे चे अधिकारी श्री वासनिक यांचेसह दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी झाले किंवा कसे यांबाबत पडताळणी करणे कामी प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी केली असता सावनेरकडून कळमेश्वरकडे जाणाऱ्या सर्व एसटी बस बसस्थानकात नियमितपणे प्रवेश करूनच प्रवाशांना चढ—उतार करतात. तसेच कळमेश्वरकडून सावनेरकडे येणाऱ्या सर्व एसटी बस तेथे बसस्थानक उपलब्ध नसल्याने नमुद बस सर्व्हिस रोडवर आतमध्ये सुरक्षित ठिकाणी थांबवून प्रवाशांना व विद्यार्थ्यांना सुखरूपपणे उतरविण्यात येते.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**